श्री. गौ.सा.इंगोले, तसेच श्री.क.चं.जाधव परिविक्षाधीन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांना एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत सीपीटीपी -७ या तुकडीमधील प्रशिक्षणासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागातून कार्यमुक्त करणेबाबत....

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग

शासन निर्णय क्रमांक :कौविउ-२०२०/प्र.क्र.१४/प्रशा.२ (रोजगार)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगूरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ जानेवारी, २०२२

<u>वाचा :</u>-१) कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टिआरएन-१०२१/प्र.क्र.२९/सीपीटीपी-अ, दिनांक २४.१२.२०२१

२) श्री.गौ.सा.इंगोले, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड यांचा दिनांक ३०.१२.२०२१ रोजीचा विनंती अर्ज

३) श्री.क.चं.जाधव, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे यांचा दिनांक ४.१.२०२२ रोजीचा विनंती अर्ज

४) आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता , नवीमुंबई यांचे पत्र क्रमांक : कौविरोउआ-२/राजप/आस्था//(०२/२०) १५३, दिनांक १२ जानेवारी, २०२२

प्रस्तावना :-

उपर्निर्दिष्ट १ येथील कार्यालयीन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत सीपीटीपी-७ या तुकडीमधील शिफारसप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना प्रशिक्षणासाठी नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदरच्या आदेशातील अ.क्र.३५ वरील उपजिल्हाधिकारी, (गट-अ) या पदावर शिफारसप्राप्त उमेदवार श्री.गौरव साहेबराव इंगोले, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड तसेच अ.क्र. १४२ येथील तहसिलदार, गट-अ या पदावर शिफारसप्राप्त उमेदवार श्री.कल्पेश चंदर जाधव, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे यांना कर्तव्यावर हजर होण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतून कार्यमुक्त करण्याची बाब शासन विचाराधीन होती.

शासन आदेश :-

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत सीपीटीपी-७ या तुकडीमधील शिफारसप्राप्त उमेदवार श्री. गौरव साहेबराव इंगोले, परिविक्षाधीन सहायक आयुक्त तसेच श्री.कल्पेश चंदर जाधव, परिविक्षाधीन सहायक आयुक्त यांनी प्रशिक्षणासाठी हजर होण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय येथून कार्यमुक्त

करण्याची उपर्निर्दिष्ट २ व ३ अन्वये आयुक्तालयास विहीत कालावधीत आगाऊ विनंती केली होती. उपर्निर्दिष्ट ४ येथील आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, नवीमुंबई यांच्या पत्रान्वये श्री.गौरव साहेबराव इंगोले तसेच श्री.कल्पेश चंदर जाधव यांना कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता यंत्रणेतून कार्यमुक्त करण्याची शिफारस केलेली आहे.

२. श्री.गौ.सा.इंगोले, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड तसेच श्री.क.चं.जाधव, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

३. श्री.गौ.सा.इंगोले, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड यांना उपजिल्हाधिकारी, गट-अ तसेच श्री.क.चं.जाधव, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे यांना तहसिलदार (गट-अ) या पदावरील एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत सीपीटीपी-७ या तुकडीमधील प्रशिक्षणासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतून दिनांक १४.१.२०२२ (म.नं.) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२२०११४१२०४३४२९०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Maharashtra State Skill Development Society, ou=eOffice, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2022.01.14 12:05:17 +05'30'

(संतोष रोकडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१) श्री.गौ.सा.इंगोले, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड (आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, नवीमुंबई मार्फत)

२) श्री.क.चं.जाधव, परिविक्षाधीन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे (आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, नवीमुंबई मार्फत)

प्रत :-

१) मा.मंत्री (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
२) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, नवीमुंबई
३) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड
४) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे
५) महालेखापाल १/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई